
# उच्च शिक्षणाचे आंतरराष्ट्रीयीकरण करताना...

डॉ. विजय खरे

भारतासाठी उच्च शिक्षणाचे आंतरराष्ट्रीयीकरण हे काही नवे नाही; नालंदा, तक्षशिला विद्यापीठांच्या काळात ते झालेच होते, हे सारे खरेच. पण गेल्या शतकभरात उच्च शिक्षणाच्या आंतरराष्ट्रीयीकरणाचा कार्यक्रम अमेरिका-चीन आदी देशांनी निराळ्या प्रकारे राबवला. भारतानेही त्या मार्गाने जायचे, तर अलीकडेच जाहीर झालेल्या नव्या शिक्षण धोरणाच्या संदर्भात काय करायला हवे, याचा ऊहापोह करणारा विशेष लेख...



**भारत सरकारने** नुकतेच नवे शैक्षणिक धोरण जाहीर करून विविध बदलांसह शिक्षणाचा नवा 'रोडमॅप' आपल्यापुढे ठेवला आहे. त्यातील सर्वात महत्त्वाच्या बदलांमध्ये 'उच्च शिक्षणाचे आंतरराष्ट्रीयीकरण' करणे आणि भारतीय शिक्षण व्यवस्थेला पुन्हा नालंदा, तक्षशिला विद्यापीठांसारखे वैभव प्राप्त करण्यासाठी विविध धोरणांचा त्यात समावेश करण्यात आलेला आहे. त्यासाठी जगातील विद्यापीठीय मूल्यांकनात पहिल्या १०० क्रमांकांवर असणाऱ्या विद्यापीठांना भारतात कुठेही शाखा उघडण्यासाठी मुभा देण्याचा मानस व्यक्त केला आहे. तसेच भारतातील मूल्यांकनात पहिल्या १०० विद्यापीठांनाही परदेशात आपली शाखा उघडण्यासाठी संधी देण्यात येणार आहे. अर्थात याबाबतचे धोरण काँग्रेसप्रणीत यूपीए सरकारने जाहीर केले होते; परंतु परदेशी विद्यापीठांची संख्या त्यात कमी होती. ती आता १०० विद्यापीठांपर्यंत नेली आहे. त्यामुळे उच्च शिक्षणाचे आंतरराष्ट्रीयीकरण करण्याबाबत काय संधी आणि आव्हाने आहेत, हे पाहणे गरजेचे आहे.

'उच्च शिक्षणाचे आंतरराष्ट्रीयीकरण' करण्यात इंग्रजीमध्ये शिक्षण, परदेशातील शिक्षण, आंतरराष्ट्रीय विषय, आंतरराष्ट्रीय विद्यार्थी, आंतरराष्ट्रीय बहुसांस्कृतिक सहयोग असे काही मापदंड मानले जातात. शिवाय आंतरराष्ट्रीय शिक्षणाद्वारे जागतिक पातळीवर आपल्या संकल्पना, योजना, पैसा, ज्ञान, सांस्कृतिक मूल्य वस्तू, तंत्रज्ञानाबरोबरच राष्ट्रा-राष्ट्रांमधील संवाद वाढावा, असे अपेक्षित असते. त्यासाठी 'सॉफ्ट डिप्लोमसी'चे धोरण अवलंबले जाते. त्यालाच 'उच्च शिक्षणाचे आंतरराष्ट्रीयीकरण' असे नाव देण्यात आलेले आहे.

**'आंतरराष्ट्रीय शिक्षणा'चा उदय...**

आंतरराष्ट्रीय शिक्षणाचा उदय आणि विकास हा साधारणपणे पहिल्या महायुद्धानंतर झालेला दिसतो. नोबेल विजेते व कोलंबिया विद्यापीठाचे प्रमुख निकोलस मरे् बटलर यांनी १९१९ मध्ये 'इन्स्टिट्यूट ऑफ इंटरनॅशनल एज्युकेशन'ची स्थापना केली. राष्ट्रा-राष्ट्रांदरम्यान सलोखा प्रस्थापित होण्यासाठी संवाद आणि शैक्षणिक देवाणघेवाण आवश्यक आहे, म्हणून या संस्थेची स्थापना करण्यात आली. पुढे १९२५ मध्ये जर्मनीत 'जर्मन अॅकॅडमिक एक्स्चेंज सर्व्हिस'ची स्थापना करण्यात आली. त्यानंतर १९३४ साली इंग्लंडमध्ये 'ब्रिटिश कौन्सिल'ची स्थापना होऊन जगभर शांतता आणि संवाद प्रस्थापित करण्यासाठी शैक्षणिक संवादाच्या प्रभावी वापरास सुरुवात झाली. युरोपमध्ये शिक्षक व विद्यार्थी यांच्यातील संवाद, सहकार्य सुरू झाले. परंतु पुढे शीतयुद्धाच्या काळात 'सुप्त शक्ती (सॉफ्ट पॉवर)'च्या नावाने अमेरिकेने 'फुलब्राइट कार्यक्रम' १९४६ मध्ये सुरू केला. तत्कालीन सोव्हिएत संघाच्या अंतराळ कार्यक्रमाला शह देण्यासाठी अमेरिकेने 'सुप्त-राजनय (सॉफ्ट डिप्लोमसी)'चा वापर करून युरोप, आशियाई व आफ्रिकी राष्ट्रांतील विविध शिक्षक व विद्यार्थी यांचा सहभाग वाढवण्यास सुरुवात केली. परंतु शीतयुद्धोत्तर कालखंडात व जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत उच्च शिक्षणाचे आंतरराष्ट्रीयीकरण झपाट्याने वाढले. १९९० मध्ये युरोपात 'ट्रान्सनॅशनल युरोपीयन मोबिलिटी प्रोग्राम' हा उपक्रम विद्यापीठीय विद्यार्थ्यांसाठी सुरू करण्यात आला. ऑस्ट्रेलियानेही 'ऑस्ट्रेलियन कौन्सिल'ची स्थापना केली. युरोपीय महासंघानेही 'इरॅस्मस मुंण्ड्युस' व 'इरॅस्मस प्लस' यांसारखे उपक्रम राबवून उच्च शिक्षणाचे आंतरराष्ट्रीयीकरण करण्यासाठी जगभर आपले विद्वत्‌जाळे निर्माण केले. विकसित राष्ट्रांसाठी हेच 'स्कॉलर' पुढे 'ब्रॅण्ड अॅम्बेसिडर' म्हणून पुढे आले आणि आज त्या-त्या विद्यापीठासाठी व देशासाठी ते इमानेइतबारे काम करीत आहेत.

**चीनची भरारी...**

भारतासाठी उच्च शिक्षणाचे आंतरराष्ट्रीयीकरण हे नवे नाही. नालंदा, तक्षशिला ही विद्यापीठे ऑक्सफर्ड व केम्ब्रिज या विद्यापीठांच्या आधीची आहेत. परंतु योग्य ध्येयधोरणे तसेच राजकीय नेतृत्वाच्या अभावामुळे आपण त्याकडे पूर्ण दुर्लक्ष केलेले आहे. त्याउलट, 'सांस्कृतिक सुप्त शक्ती'द्वारे चीनने जगभर आपले जाळे विणले आहे. २०१७ मध्ये चीनने तब्बल ५२५ कन्फ्युशिअस संस्था आणि १,११३ कन्फ्युशिअस क्लासरूम स्थापन केल्या. त्यात सुमारे ९० लाख विद्यार्थी आणि ४६ हजार पूर्णवेळ व अर्धवेळ शिक्षक सहभागी आहेत. ४१ हजार भाषिक अभ्यासक्रमही त्याद्वारे शिकविले जातात. चीनने आशियाई विद्यार्थ्यांसाठी ३० हजार शिष्यवृत्ती उपलब्ध करून दिल्या आहेत. जगभरातील ७० देशांमध्ये चीनने विविध केंद्रे स्थापन केली आहेत; तसेच चीनचे जे विद्यार्थी परदेशात शिक्षण घेत होते त्यांना राष्ट्रउभारणीसाठी परत बोलावून घेतले आहे. २०१६ सालच्या एका अहवालानुसार, पाच लाख ४४ हजार ५०० चिनी विद्यार्थ्यांपैकी चार लाख ३२ हजार ५०० विद्यार्थी मायदेशी येऊन देशाची सेवा करीत आहेत.

त्याउलट आपल्याकडे सरकारी संस्था- त्यातही आयआयटी, आयआयएम यांसारख्या संस्थांमधून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे परदेशी स्थायिक होणे हे जणू स्वप्नच असते. ते भारतात परत येण्यासाठी उत्सुकही नसतात. त्यामुळे उच्च शिक्षणाचे आंतरराष्ट्रीयीकरण करताना केवळ आपला 'ब्रेन' बाहेर पाठवून चालणार नाही, तर त्याला काही कालावधीसाठी परत बोलावून इथे सेवा देणे सक्तीचे करणे गरजेचे आहे. त्यादृष्टीने भारतापुढे सध्या उच्च शिक्षणाचे आंतरराष्ट्रीयीकरण करण्यासाठी कोणत्या संधी आणि कोणती आव्हाने आहेत, हे पाहायला हवे.

**जगभरातले विद्यार्थी भारतात; पण...**

भारतात २०१८-१९ मध्ये एकूण १६४ देशांमधील ४७,४२७ विद्यार्थी शिक्षण घेत होते. त्यात सर्वात जास्त नेपाळचे विद्यार्थी असून त्यांचा सहभाग २६.८८ टक्के एवढा होता. त्यानंतर अफगाणिस्तान ९.८ टक्के, बांगलादेश ४.३८ टक्के, सुदान ४.०२ टक्के, भूतान ३.८२ टक्के, नायजेरिया ३.४ टक्के, अमेरिका ३.२ टक्के (त्यात अनिवासी भारतीयांचे प्रमाण जास्त), येमेन ३.२ टक्के, श्रीलंका २.६४ टक्के, इराण २.३८ टक्के एवढे विद्यार्थी भारतात शिक्षण घेताना दिसतात. नेपाळमधील विद्यार्थ्यांत मुलींपेक्षा मुलांचे प्रमाण जास्त आहे; तर सुदान, येमन, अफगाणिस्तान येथील विद्यार्थ्यांमध्ये मुलींचे प्रमाण जास्त आहे. तसेच ७३.४ टक्के मुले पदवी परीक्षेसाठी प्रवेशित आहेत, तर १६.१५ टक्के पदव्युत्तर वर्गांसाठी आहेत व काही पीएच.डी.साठी आहेत. युनेस्कोच्या अहवालानुसार, आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांसाठी भारत हे 'प्रेफर डेस्टिनी' आहे. १९७७-७८ मध्ये भारतात दक्षिण आशियातील १६ हजार विद्यार्थी होते, तर २०१७-१८ मध्ये त्यांची संख्या ४६,१४४ एवढी झालेली आहे. म्हणजेच जवळपास तीनपट वाढ झाली. त्याउलट भारतातील तीन लाख पाच हजार ९७० विद्यार्थी भारताबाहेर शिकताहेत; त्यांनी निवडलेल्या शिक्षणसंस्थांमध्ये इंग्लंड, अमेरिका, ऑस्ट्रेलिया, कॅनडा व युरोप येथील विद्यापीठांचा समावेश आहे.

रिझर्व्ह बँकेच्या अहवालानुसार, भारतातील विद्यार्थी २०१३-१४ मध्ये १.९ बिलियन डॉलर, तर २०१७-१८ मध्ये २.८ बिलियन डॉलर एवढा खर्च परदेशात करीत आहेत. अमेरिका जेवढा पैसा भारताला शस्त्रे विकून कमावत नाही, त्यापेक्षा जास्त पैसा भारतीय विद्यार्थ्यांकडून कमवीत आहे. याउलट आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात भारताचा २६ वा क्रमांक लागत आहे.




केंद्र सरकारने २०१० मध्ये मंजूर केलेल्या 'परदेशी विद्यापीठ (स्थापना व नियमन) कायद्या'नुसार दिल्लीच्या कॅनॉट प्लेस भागात 'युनिव्हर्सिटी ऑफ शिकागो'चे उपकेंद्र गेले दशकभर सुरू आहे.
(छायाचित्र सौजन्य : युनिशिकागो.इन)

त्यामुळे नव्या शैक्षणिक धोरणामध्ये या बाबीचा सविस्तर ऊहापोह होणे गरजेचे आहे. केवळ आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांची संख्या वाढवून चालणार नाही, तर जागतिक पातळीवरील विद्यापीठांच्या शिक्षक-विद्यार्थी यांच्यातील संवाद, प्रकाशने, पेटंट, संयुक्त संशोधन, गुणवत्तापूर्ण संशोधन यांवर भर देण्यासाठी ठोस योजना आणल्या पाहिजेत. भारत सरकारने 'ग्लोबल इनिशिएटिव्ह ऑफ अॅकॅडमिक नेटवर्क्स' ही योजना सुरू केलेली आहे. त्यात आता भारतातील शिक्षकही परदेशात जाऊन ज्ञानार्जनाची कामे करू शकतात. अशा योजनांवर भर देणे गरजेचे आहे. 'भारतीय सांस्कृतिक संबंध परिषदे (आयसीसीआर)'च्या माध्यमातून जगभरातून सहा हजार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाते. या शिष्यवृत्तींचा केवळ पदवी देण्यासाठी उपयोग न करता, त्या विद्यार्थ्यांना 'ब्रॅण्ड अॅम्बेसिडर' म्हणून कार्यान्वित करणे गरजेचे आहे. शिवाय भारतातून जे विद्यार्थी बाहेर जात आहेत, त्यांना भारतात येऊन भारताची सेवा करण्याची सक्ती करणे गरजेचे आहे. तसेच केवळ १०० विद्यापीठांना भारतात बोलावून किंवा आपल्या विद्यापीठांना बाहेर पाठवून गुणवत्तेमध्ये फार बदल होणार नाही. त्यासाठी कुशल मनुष्यबळासह योग्य नेतृत्व व क्षमता असणाऱ्या व्यक्तींची गरज आहे.

भारतातील आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांमध्ये आफ्रिक व मध्य आशियातील विद्यार्थ्यांचा भरणा अधिक आहे. भारतामध्ये शिक्षण स्वस्त आहे म्हणून इथल्या विज्ञान व व्यावसायिक अभ्यासक्रमांना त्यांची पसंती असते. भारताने 'स्टडी इंडिया'सारख्या नव्या धोरणाची अंमलबजावणी केली आहे. परंतु त्यातही दक्षिण आशिया व आफ्रिकी राष्ट्रांमधील विद्यार्थ्यांची संख्या जास्त आहे. याउलट, युरोपीय-अमेरिकी आणि इतर विद्यापीठांतील विद्यार्थ्यांचा कल इथली कला, संस्कृती, भाषा यांचे ज्ञान अवगत करण्याकडे आहे. म्हणून भारतातील विद्यापीठे व संस्थांनी आत्मपरीक्षण करणे गरजेचे आहे. स्वातंत्र्योत्तर ७० वर्षांनीही आपण विज्ञान व व्यावसायिक क्षेत्रात आघाडी का घेऊ शकलो नाही, याचा विचार नवीन शैक्षणिक धोरणात- विशेषतः उच्च शिक्षणाचे आंतरराष्ट्रीयीकरण करताना होणे गरजेचे आहे. त्यासाठी दीर्घलक्ष्यी रणनीती आखणे गरजेचे आहे. तसे केल्यास भारतही चीनच्या पुढे जाऊ शकतो. परंतु केवळ 'भारतीय संस्कृती किती महान आहे' यावरच उच्च शिक्षणाचे आंतरराष्ट्रीयीकरण करणार असू तर जगातील विकसित राष्ट्रे भारताकडे केवळ 'सोर्स कण्ट्री' म्हणून पाहतील.

**(लेखक सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात संरक्षण व सामरिक शास्त्र विभागाचे प्रमुख आहेत.)**
kharevijay95@hotmail.com